Title of Programme: **वाचन संवाद कार्यक्रम**

Name of Organizing Department : **मराठी विभाग**

Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**

Date of the Programme : १०/१०/२०२६

Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर**

Target Group: **तृतीय वर्ष कला शाखा**

Number of Participants: ४०

Name of Resource Person: - **डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. वैभवी कोपर्डे**

Total Expenditure for the Programme: ३५०/-

Source of Funding: - **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**Report: वाचन प्रेरणा दिन अहवाल**

खेड तालुका शिक्षण प्रसाराम मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दि. १०/१०/२०२६ रोजी माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनोगतांना अभिव्यक्तीचे व्यासपीठ देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या मुक्त मनोगतांचा आणि पुस्तकांविषयीच्या अनुभवांचा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

वाचन ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्व विकासाची, विचारांना दिशा देण्याची आणि जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारी कृती आहे, या विचारातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी त्यांनी वाचलेल्या आणि मनाला भावलेल्या पुस्तकांविषयी मोकळेपणाने आपले विचार व्यक्त केले. पुस्तकांमधून मिळालेले अनुभव, प्रेरणा, जीवनमूल्ये आणि विचार यांविषयी विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनानुभव व्यक्त करण्यासाठी आणि इतरांच्या वाचनविश्वाची ओळख करून घेण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले.

यावेळी कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी ‘वाचनाचे जीवनातील महत्त्व’ या विषयावर मार्गदर्शन केले. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारप्रक्रिया विकसित होते, भाषिक अभिव्यक्ती समृद्ध होते आणि व्यक्तीच्या दृष्टिकोनाला व्यापकता प्राप्त होते, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील पुस्तकांबरोबरच अवांतर वाचनाची सवय जोपासावी आणि वाचनातून मिळणारे विचार दैनंदिन जीवनात आचरणात आणावेत, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी ‘पुस्तके माणसाला घडवितात’ या विषयावर मनोगत व्यक्त केले. पुस्तकांच्या सहवासातून व्यक्तीच्या विचारांना प्रगल्भता येते, जीवनातील प्रश्नांकडे पाहण्याची समज विकसित होते आणि व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले. पुस्तक हे माणसाला समृद्ध करणारे आणि योग्य दिशा दाखविणारे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रा. वैभवी कोपर्डे यांनी ‘पुस्तकांचे जीवनातील स्थान’ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुस्तकांमुळे ज्ञान, अनुभव आणि संस्कार यांची शिदोरी मिळते. वाचनामुळे कल्पनाशक्ती, चिकित्सक विचार आणि अभिव्यक्तिक्षमता विकसित होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून स्वतःचे समृद्ध वैचारिक विश्व निर्माण करावे, असे त्यांनी सांगितले.

‘वाचन संवाद’ या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकांची माहिती सांगण्याची संधी मिळाली नाही, तर स्वतःचे विचार मांडण्याचा, इतरांचे अनुभव ऐकण्याचा आणि वाचनाविषयीची आवड अधिक दृढ करण्याचा अनुभवही मिळाला. वाचन संस्कृती विकसित करणे, विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांविषयी आत्मीयता निर्माण करणे आणि त्यांना स्वतंत्रपणे विचार करण्यास प्रवृत्त करणे, ही या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे होती.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वाचलेल्या आणि मनाला भावलेल्या पुस्तकांविषयी मोकळेपणाने विचार व्यक्त केले. पुस्तकांमधून मिळालेले अनुभव, प्रेरणा, जीवनमूल्ये आणि विचार यांविषयी विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली. प्रिया भालसिंगे, अर्पिता बुरुड, तनुप्रिया जैद, सिमरन कोळेकर, सृष्टी रगडे, सुदर्शन टाकळकर, पवन पारधी, प्रतीक लोहकरे आणि अजय चौधरी या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे वाचन प्रेरणा दिनाचा हा उपक्रम ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरला. पुस्तकांशी मैत्री जोडणारा आणि वाचनातून विचारांना नवी दिशा देणारा ‘वाचन संवाद’ हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या वैचारिक समृद्धीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.

## कार्यक्रमाचे छायाचित्रे



डॉ. संजय शिंदे मार्गदर्शन करताना



प्रा. वैभवी कोपर्डे मार्गदर्शन करताना



डॉ. बाळासाहेब अनुसे मार्गदर्शन करताना



सहभागी विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देताना



सहभागी विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देताना